**नि. दि. दा. क. २४/२०१३**

**पुढील उलटतपास प्रतीवादी तर्फे श्री एस. एन पांडे वकील साहेब, शपथेवर सुरु**

वादातील सर्व जमीन ही रामजी ठाकरे यांच्या मालकीची होती. रामजींच्या मुलांपैकी नत्थु, केशवराव, माणीकराव हे तिष्ठी येथे राहत असत व बाकीची मुले ही बाहेरगावी राहत असत. हे म्हणणे खरे आहे की माणीकराव व केशवराव हे मयत असुन त्यांची त्यांचे कोणतेही वारस तिष्ठी गावात राहत नाही. नत्थुचा मुलगा दादाराव हा त्याच्या मृत्युपर्यंत तिष्ठीत राहीला. हे म्हणणे खरे नाही की रामजी यांच्या नाव खसरा क. २१०/९ व खसरा क. २०८/१ असल्याबाबतचा सात बारा उतारा मी दाखल केला असल्याचे खोटे कथन करीत आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की मी फेरफार पंजी दाखल केली आहे. मला रामजींच्या वडीलांचे नाव माहीत नाही. आता मी कॉम्प्रमाईज डीड निट वाचुन पाहीले असता त्यामध्ये खसरा क. २०८/१ ही मिळकत नमुद असुन खसरा क. २१०/९ ही मिळकत नमुद नाही. या कॉम्प्रमाईज डिडला **नि. क. १२९** देण्यात येतो. या कॉम्प्रमाईज डीडमध्ये खसरा क. २०८/१ याची आराजी एक हेक्टर आहे.

(**सदरील प्रश्नास व आलेल्या उत्तरास वादीच्या वकीलांचा तिव्र आक्षेप सदरील आक्षेप हा अंतिम युक्तीवादाच्या वेळी लक्षात घेण्यात येईल**.)

खसरा क २१०/९ व २०८/१ हे क्रमांक रामजींच्या वेळेसचे आहेत. हे क्रमांक बदलले गेले आहेत. मी नवीन सर्व्हे क. २९० जिची आराजी १.२४ एच आर अशी दाव्यामध्ये नमुद केली आहे त्याबाबतचा ७/१२ उतारा मी दाखल केला नाही, हे म्हणणे खोटे आहे. आता मला नि. क ७५ वरील ७/१२ उतारा दाखविला असता त्यामध्ये सर्व्हे क २९० या मिळकतीची आराजी १.१० हेक्टर आर दर्शविली आहे. माझ्या दाव्यामध्ये सर्व्हे क. २९१ या मिळकतीची आराजी १.१० हेक्टर आर दर्शविली आहे. आता मला नि. क ७६ वरील ७/१२ उतारा दाखविला असता त्यामध्ये सर्व्हे क २९१ या मिळकतीची आराजी १.३६ हेक्टर आर दर्शविली आहे. माझ्या दाव्यामध्ये सर्व्हे क. २९२ ची आराजी १.३६ हेक्टर आर दर्शविली आहे. आता मला नि. क ७७

वरील ७/१२ उतारा दाखविला असता त्यामध्ये सर्व्हे क्र २९२ या मिळकतीची आराजी १.२४ हेक्टर आर दर्शविली आहे. हे म्हणणे खोटे आहे की, माझ्या दाव्यामध्ये चतुरसीमांचे वर्णन केलेले नाही. साक्षीदार दावा पाहतो आणि पुन्हा केथन करतो की चतूरसीमा नमुद नाहीत. (साक्षीदारास चतुरसीमा हा शब्द समजवुन सांगतांना त्यांना दक्षीण, उत्तर, पुर्व, पश्चिम असल्याबाबत या न्यायालयाने सांगितले). मी नि. दावा क्र २७ /०९ हा दावा वाद मिळकत क्र. २९२ आराजी १ हेक्टर २४ आर यासाठी मधुकर लक्ष्मण डोंगरे यांच्या विरुध्द दाखल केला होता. त्या दाव्याच्या न्यायनिर्णयाची प्रत मी दाखल केली असुन हा न्यायनिर्णय दि. २०.७.२०१२ रोजीचा आहे. या न्यायनिर्णयास **नि. क्र. १३०** देण्यात आला. हे म्हणणे खोटे आहे की, भुमी अभिलेख विभागामध्ये खसरा क्र. २९२ आराजी १ हेक्टर २४ आर ही मिळकत मधुकर डोंगरे यांच्या नावे आज रोजी आहे. भुमी अभिलेख अधिक्षक यांनी खसरा क्र. २९२ आराजी १.२४ आर ही मिळकत मधुकर डोंगरे यांच्या नावे लागण्याकरीता एस.डी. ओ. साहेबांकडे प्रस्ताव दिला असता त्याच्यावर झालेल्या आदेशाविरुध्द मी अप्पर आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले असुन त्यामध्ये मला स्टेथस्को मिळाला आहे. नियमीत दावा क्र. २७/०९ हा दावा प्रलंबित असतांना मी खसरा क्र २९२ हा मोजला असल्याबाबतची तारीख मला आठवत नाही. पण मे २००९ मध्ये मी ही जमीन मोजलेली आहे. या जागेचा पंचनामा तालुका भुमी अभिलेख कार्यालयाच्या कर्मचा-याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खोटे आहे की, या पंचनाम्यावर मी सही केली. हे म्हणणे खोटे आहे की, या पंचनाम्या वेळीस मी गेदराव व ईतर कोणताही वादी सर्व्हे क्र २९२ च्या कब्ज्यामध्ये नसल्याचे मान्य केले होते. साक्षीदार पुन्हा म्हणतो की हे खरे आहे पण नंतर पुन्हा म्हणतो की हे खोटे आहे. हे म्हणणे खोटे आहे की, नियमीत दिवाणी दावा क्र २७/०९ मध्ये मी सर्व्हे क्र. २९२ च्या मालकी संदर्भात कोणताही दस्त दाखल केला नव्हता. हे म्हणणे खोटे आहे की, मी प्रस्तुतचा दावा हा चुकीच्या मिळकतीवर चुकीच्या केलेल्या वर्णना आणारे व क्षेत्रा आधारे दाखल केला आहे. मी फेरफार क्र. ६४ ज्यामध्ये दि. २९.१०.१९८७ रोजी दावा मिळकत खसरा क्र २१०/९ व २०८/१ ही चंद्रकलाबाई व कमलाबाई यांच्या नावे लागली

असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नि. क्र ११२ वर दाखल केला आहे. १९८४ मध्ये या मिळकती दादारावच्या नावे लागल्या होत्या. फेरफार क्र. ६४ हा रदद होउन त्यावरती माझे व प्रतिवादींचे नाव वाद मिळकती संदर्भात लागले आहे. हे म्हणणे खोटे आहे की, १९८४ पासुनचे महसुल विभागामधील फेरफारांबाबतच्या कार्यवाहयांमध्ये कमलाबाई व चंद्रभगाबाई त्या या मिळकतींच्या कब्जात नसल्याचे मान्य केले होते. हे म्हणणे खोटे आहे की, वाद मिळकत ही प्रतिवादींच्या ताब्यात आहे. कॉम्प्रमाईज डिड नि. क्र १२९ मधील सर्व पक्षकार हे आजच्या घडीला मयत आहेत. फक्त रंजना ठाकरे या हयात असुन बाकी सर्व पक्षकारांचे वारस जिवंत आहेत. हे म्हणणे खोटे आहे की, दावा मिळकत हे दादाराव ठाकरे वाटणी अगोदरपासुन एकटेच वाहत होते. चंद्रभागाबाई या दि. १.९.१९९९ रोजी मरण पावल्या असुन माझी आई कमलाबाई ही दि १८.२.१९९८ रोजी मरण पावली. लग्नानंतर चंद्रभागाबाई या माळेगाव येथे नांदावयास गेल्या व माझी आई कमलाबाई ही टेकाडी येथे नांदावयास गेली. हे म्हणणे खोटे आहे की, या दोघींचे सासर गर्भ श्रीमंत होते. हे म्हणणे खोटे आहे की, आमचे कुटुंब एक काळचे मालगुजार होते. हे म्हणणे खोटे आहे की, १९८० साली दादाराव हा चंद्रभागाबाई व कमलाबाई यांचा लाडका भाचा असल्या कारणाने त्यांनी आपल्या नावाची मिळकत ही दादारावच्या नावाने लिहुन दिली. हे म्हणणे खोटे आहे की, १९८० पासुन ते आजतागायत दादाराव व दादाराव नंतरचे वारस दावा मिळकतीच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की १९८४ साली १९८० च्या दस्ताअन्वये दावा मिळकत ही दादारावच्या नावे लागली. हे म्हणणे खोटे आहे की, १९८४ साली दादारावने १९८० सालचा मुळ दस्त हा तहसीलदार साहेबांना देउन या दस्ताबाबतची नोंद तहसीलदार साहेबांनी त्यांच्या आदेशात केली. हे म्हणणे खोटे आहे की, या आदेशाविरुध्द कमलाबाईने व चंद्रभागाबाईने एस.डी.ओ.कडे अपील केली होती. साक्षीदार पुन्हा असे सांगतो की कमलाबाईच्या व चंद्रभागाबाईच्या वतीने मी एस.डी. ओ. कडे तहसीलदार साहेबांच्या आदेशान्वये अपील केली होती कारण त्या न्यायालयात येउ शकत नव्हत्या. एस.डी.ओ. कडील निकाल हा आमच्याकडुन लागला. या एस.डी. ओ. च्या आदेशाविरुध्द अतिरीक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल झाले व ह अपिल

प्रतिवादींनी केले होते. अतिरीक्त जिल्हाधिकारी यांचा आदेश प्रतिवादींच्या बाजुने लागला. त्यानंतर आम्ही कमीश्नरकडे अपिल केले असे साक्षीदार स्वत: सांगतो. अतिरक्त आयुक्ताने हे प्रकरण फेरतपसणीकरीता एस. डी.ओ. कडे पाठविले व एस. डी.ओ पुन्हा फेरतपासणीकरीता पुन्हा तहसीलदाराकडे पाठविले. १९८४ सालच्या फेरफाराबाबतचा आदेश तहसीलदारसाहेबांनी त्यास कायम ठेवला.

**मध्यान्हामुळे पुढिल उलटतपास तहकुब करण्यात येतो.**

माझेसमक्ष

**(व्ही.बी.कांबळे)**

**दिनांक : ०६.०४.२०१८**

**सह. दि. न्या क. स्तर,**
**कळमेश्वर**

**पुढिल उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु.**

शेतीचा मालक हा शेतीचा महसुल भरतो. हे म्हणणे खोटे आहे की, पटवारी हा ति-हाईत माणसाकडुन महसुल भरुन घेत नाही. चंद्रभागाबाई व कमलाबाईमध्ये जमीनीच्या वाटण्या झाल्या नव्हत्या. नि. क्र. १०६ वरील खरेदी खताची मुळ प्रत माझ्या घरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रभागाबाईकडुन रक्कम रुपये ५०,०००/- माझ्या म्हणण्याप्रमाणे विकत घेतल्याबाबत व विकत घेतांना माझयाकडे रक्कम रुपये ५०,०००/- असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. चंद्रभागाबाईंना माझ्या म्हणण्याप्रमाणे मी जे ५०,०००/- रुपये दिले, ते पैसे दिल्याबाबतची तारीख खरेदी खतात नमुद नाही. नि. क्र. १०६ वरील खरेदी खतामध्ये विकत घेतलेल्या जमीनीच्या चतुरसीमा बाबतचा भाग रकाना हा रिकामा आहे. मी खरेदी खत आता वचले असता त्यामध्ये वहीवाट हा शब्द लिहीला असुन माझ्या मते वहीवाट म्हणजेच ताबा असा आहे. खरेदी खताच्य आदल्या दिवशीच मला माझ्या मावशीने म्हणजे चंद्रभागाबाईने जमीनीचा ताबा दिला होता. सदरील बाब माझ्या खरेदी खतात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

प्रश्न:- नि. क्र. १०६ वरील तुम्ही पेश केलेली खरेदी खताच्या प्रतीवर लिहुन घेणार व लिहुन देणार व साक्षीदार यांच्या सहया नाहीत व अंगठाही नाही ?
उत्तर :- या खरेदीखतावर माझी जी डी कुईटे म्हणुन माझी सही आहे,

चंद्रभागाबाईचा ठसा आहे व ५०,०००/- रुपयांचे विक्रीपत्र आहे. साक्षीदार पुन्हा असे सांगतो की दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यांची नावे बंडु रामराव वाकोडे व बेबी बंडुजी वाकोडे असे आहे.

प्रश्नः- नि. क्र. १०६ वरील तुम्ही पेश केलेली खरेदी खताच्या प्रतीवर तुम्हाला चंद्रभागाबाईच्या हाताच्या अंगठा दिसतो आहे काय ?
उत्तर :-या खरेदीखतावर आंगठयाचा ठसा नसुन कंसामध्ये ठसा असे लिहीलेले आहे.

प्रश्नः- या खरेदी खतावर जी काही नावे सहया व आंगठयांचा उल्लेख आहे ती मुळ नक्कल नसुन छायांकीत प्रतीमध्ये आहे ?
उत्तर :-ती छायांकीत प्रतमध्ये आहे.

प्रश्नः- मुळ विक्रीपत्र तुम्ही सोबत आज न्यायालयात आणले आहे काय ?
उत्तर :-मी मुळ विक्रीपत्राची प्रत न्यायालयात आणली नाही, ती माझ्या घरी आहे.

हे म्हणणे खरे नाही की मी केणत्याही पैशाच्या स्वरुपात मोबदला न देता बोगस वक्रीपत्र तयार करुन घेतलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की दि. २२.१.२००३ रोजी शोभाबाईंनी गभने वकीलांमार्फत शंकरराव कावडकर यांना वादातील मिळकत विकत घेउ इच्छित असल्याबाबत व ती त्यांनी घेउ नये याबाबत नोटीस पाठविली होती. मी २२.१.२००३ रोजी दादाराव शंकर कावडकर यांना दावा मिळकत माझ्यासाठी पिकविण्याकरीता दिली होती. व त्यांना मी त्याबाबतचा मोबदला दिला होता. मी दादाराव शंकर कावडकर यांना साक्षीदार म्हणुन तपासणार नाही. दादाराव जेव्हा मयत झाले तेव्हा त्यांची मुले म्हणणेज प्रतिवादी क्र. २ व ३ हे अज्ञान होते. हे म्हणणे खोटे आहे की तिची मुले लहान असल्याने शोभाबाई ही शेती गावातील लोक लावुन करीत असे. हे म्हणणे खोटे आहे की शोभाबाई ही विधवा असल्याने मधुकर डोंगरे यांनी जमीन सर्व्हे क्र २९२ वर अतिक्रमण केले. हे म्हणणे खोटे आहे की बाकीची उर्वरीत जमीन ही प्रतिवादींच्या उत्पन्नाचे साधन आहे. हे म्हणणे खोटे आहे की दादाराव व त्यांच्या पश्चात त्याचे वारसांच्या ताब्यात वाद मिळकत आहे. मी खरेदीदार या नात्याने वाद मिळकतीमध्ये विकत घेतलेल्या हिश्याच्या संदर्भात मालकी हक्क व ताब्यासाठी प्रतिवादीविरुध्द दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खोटे आहे की माझा व ईतर

वादींचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नसुन आम्ही प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खोटे आहे की मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**.

**<u>कोर्ट प्रश्न</u>**:-दावा क्र. २७/२००९ मध्ये जो काही निकाल लागला त्या निकालाविरुध्द तुम्ही अपिल दाखल केली आहे काय ?

**<u>उत्तर</u>**:- दावा क्र. २७/२००९ मध्ये जो काही निकाल लागला त्या निकालाविरुध्द मी अपिल दाखल केली आहे व ती सध्या सुरु आहे.

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत

**(व्ही.बी.कांबळे)**
**सह. दि. न्या क. स्तर,**
**कळमेश्वर**

माझे समक्ष

**(व्ही.बी.कांबळे)**
**सह. दि. न्या क. स्तर,**
**कळमेश्वर**

**दिनांक : ०६.०४.२०१८**